# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि. १२ ऑक्टोबर, २०२०

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सोमवार दि.१२ ऑक्टोबर पासून सुरळीत सुरु झाल्या. पहिल्याच दिवशी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ७० % विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे ऑनलाईन परीक्षा दिली. पहिल्या दिवशी परीक्षेसाठी लॉगइन झालेला कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहीला नाही. थेट धडगावपासून यावलपर्यतच्या दुर्गम व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे ऑनलाईन परीक्षा दिली.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा दि. १२ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत होत आहेत. एकूण ५३ हजार ५६४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यंदा प्रथमच ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पध्दतीने परीक्षा होत आहेत. ऑनलाईन परीक्षेसाठी ३९ हजार ९० विद्यार्थ्यांनी तर ऑफलाईन परीक्षेसाठी १४ हजार ४७४ विद्यार्थ्यांनी पर्याय निवडला आहे. सायंकाळी ५ वाजेपर्यंत पहिल्या दोन सत्रातील परीक्षांमध्ये ३५ हजार २९ पैकी २३ हजार ९६१ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. ऑफलाईन परीक्षेची आकडेवारी सायंकाळी उशिरापर्यंत प्राप्त झाली नव्हती. ऐनवेळी ऑफलाईनच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडल्यामुळे ही आकडेवारी मिळू शकली नाही. तर काही ऑनलाईनच्या विद्यार्थ्यांनी ऑफलाईनचा पर्याय निवडला.

सोमवारी सकाळी १० वाजता ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षांना प्रारंभ झाला. सायंकाळी ५ वाजेपर्यंत २१३ विषयांसाठी २३ हजार ९६१ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. ऑफलाईनसाठी जळगाव , धुळे व नंदुरबार या तिनही जिल्ह्यात एकूण १७९ परीक्षा केंद्र होते. विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीचे परीक्षा केंद्र निवडीची मुभा देण्यात आली होती. ऑफलाईन परीक्षा होणाऱ्या परीक्षा केंद्रावर परीक्षा हॉलमध्ये जाण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या तापमानाची इनफ्रारेड थर्मामीटरद्वारे तपासणी केली जात होती व हातावर सॅनिटायझर टाकून मगच प्रवेश दिला जात होता. परीक्षा हॉलमध्ये एकूण क्षमतेच्या ५० टक्केच विद्यार्थ्यांची बसण्याची व्यवस्था योग्य ते शारीरिक अंतर राखून करण्यात आली होती. कोवीड -१९ च्या मार्गदर्शक तत्वानुसार विद्यार्थ्यांची सुरक्षा व परीक्षेचे पावित्र्य राखून या परीक्षा सुरू झाल्यात.

सोमवारी सकाळी १० वाजता कुलगुरू प्रा. पी.पी. पाटील व जिल्हाधिकारी श्री. अभिजीत राऊत यांनी मुळजी जेठा महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर भेट देवून पाहणी केली. परीक्षा केंद्रातील हॉलमध्ये जाऊन कशाप्रकारची व्यवस्था केली आहे याचा आढावा घेतला. यावेळी सिनेट

सदस्य तथा देखरेख समिती सदस्य प्रा. अनिल पाटील, विष्णू भंगाळे, डॉ. के.जी. कोल्हे, मनिषा चौधरी उपस्थित होते. प्राचार्य एस.एन. भारंबे यांनी केंद्राच्या व्यवस्थेविषयी माहिती दिली. यावेळी आंतर विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अशोक राणे हे उपस्थित होते. कुलगुरू प्रा. पी.पी. पाटील यांनी आय.एम.आर. व जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाला भेट देवून पाहणी केली. सायंकाळी त्यांनी धरणगाव व एरंडोल येथील परीक्षा केंद्रांनाही भेटी दिल्या.

विद्यापीठाने या परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये याची पुरेपुर दक्षता घेतली आहे. त्यासाठी काहीसे लवचिक धोरणही अवंलबले आहे. विद्यार्थी परीक्षा केंद्रावर काहीवेळ उशिरा आला तरी त्याला परीक्षेला बसू दिले गेले. हॉल तिकीट संदर्भात अडचण भासल्यास विद्यार्थ्याकडून हमीपत्र भरून घेत परीक्षेला बसू देण्यात आले. ऑनलाईन परीक्षेबाबतही विद्यापीठाने तीन तासांचा विंडो कालावधी दिल्यामुळे ज्याविद्यार्थ्यांना लॉगईन करतांना अडचणी येत होत्या त्या दूर झाल्या. उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी Chatbot तसेच महाविद्यालय निहाय नियुक्त केलेल्या आय.टी. समन्वयकामार्फत तात्काळ दूर करण्यात आल्या. त्यामुळे पहिल्या दिवशी परीक्षेसाठी लॉगइन झालेला कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिला नाही. प्रारंभीच्या तासाभरातच साडेपाच हजार विद्यार्थ्यांनी आपला सोडविलेला पेपर सबमिट केला होता.

विद्यापीठाने परीक्षा विभागात वॉर रूमची स्थापना केली आहे. ऑनलाईन परीक्षेत तांत्रिक अडचणी उद्भवल्या तर त्या तात्काळ वॉर रूममधील प्राध्यापकांनी जलदगतीने सोडविल्या. प्रा. के.एफ. पवार हे या वॉर रूममध्ये समन्वयक म्हणून काम करत असून त्यांच्या सोबत डॉ. नवीन दंडी, डॉ. अमरदीप पाटील, डॉ. सी.टी. आगे, प्रा. मनोज पाटील, श्री. मनोज निळे हे काम करीत आहेत. दिलीप लोहार हे सहकार्य करीत आहेत. परीक्षा सुरळीत व्हाव्यात यासाठी प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार, अधिष्ठाता प्रा.ए.बी.चौधरी व परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी सातत्याने प्रयत्नशील आहेत.

ऑफलाईन परीक्षा या कोविडच्या पार्श्वभूमीवर सुरळीत व्हाव्यात यासाठी देखील विद्यापीठाने तीनही जिल्हयांसाठी देखरेख समित्या नियुक्त केल्या आहेत. या समिती सदस्यांनी त्यांना दिलेल्या तालुक्यांमधील परीक्षा केंद्रांना भेटी देवून पाहणी केली. अडचणी असतील तिथे त्या दूर केल्या. या समितीमध्ये श्री. दीपक पाटील, श्री. दिनेश नाईक, श्री. अमोल पाटील, वर्षा मानवदकर, डॉ. अनिल पाटील, डॉ. के.जी. कोल्हे, श्री. विष्णू भंगाळे, मनिषा चौधरी, प्रा. नितीन बारी, प्रा. एकनाथ नेहते, प्रा. नितीन झाल्टे, प्रा. पी.पी. जंगले, प्रा. एस.के. शेलार, प्रा.एन.झेङपाटील, डॉ.वैशाली सोनवणे, श्री. नितीन ठाकूर, प्रा. मोहन पावरा, श्री. विवेक लोहार, श्री. अमोल मराठे, श्री. अमोल सोनवणे, डॉ. पी.बी. अहिरराव, डॉ. गौतम कुवर, डॉ.एम.एम.जोगी

डॉ. विजय शर्मा, डॉ. सुनील गोसावी, डॉ. एस.एन. शर्मा, डॉ.जे.के. पिंपरे, डॉ.एम.बी. पाटील यांचा समावेश आहे.

## दिव्यांग विद्यार्थिनीला घरपोच पेपर

विद्यापीठाने दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षा देतांना कोणतीही अडचण येवू नये यासाठी काळजी घेतली आहे. आरती निकम या एम.एस.डब्ल्यूच्या विद्यार्थिनीला ऑफलाईन परीक्षा देण्यासाठी परीक्षा केंद्रावर येणे शक्य नसल्यामुळे कोल्हे नगर येथील तिच्या निवासस्थानी दूताकरवी पेपर दिला व तो सोडविल्यानंतर परत घेण्यात आला. विद्यापीठाने केलेल्या या व्यवस्थेबद्दल आरतीने समाधान व्यक्त केले. दिव्यांगांची प्रतिकार शक्ती अगोदरच कमी असते. कोविडमुळे त्यांना घराबाहेर निघणे शक्य नाही. परीक्षा केंद्रावरही पायऱ्या चढणे वा इतर समस्या उदभवू शकतात त्यामुळे विद्यापीठाने ही अडचण लक्षात घेवून कुलगुरू प्रा. पी.पी. पाटील व विद्यापीठ प्रशासनाने घरपोच परीक्षा देण्याची व्यवस्था केल्याबद्दल आरतीने आनंद व्यक्त केला.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि. १२ ऑक्टोबर, २०२०

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अंतीम वर्षाच्या परीक्षेच्या पहिल्या दिवशी सायंकाळी ७ वाजेपर्यंत ७३ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली होती.

सायंकाळी उशीरापर्यंत ऑनलाईन परीक्षा सुरू होती. सायंकाळी ७ वाजेपर्यंत २५ हजार ९०३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. दरम्यान सायंकाळपर्यंत ८८ महाविद्यालयातून ऑफलाईन परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची जी आकडेवारी प्राप्त झाली त्यामध्ये ३ हजार ७७१ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली होती. उर्वरित महाविद्यालयातील माहिती प्राप्त झालेली नाही. ऑफलाईन परीक्षेसाठी १७९ परीक्षा केंद्रे आहेत. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

जळगाव/धुळे/नंदूरबार

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी